**महाराष्ट्र शासन**
**शिक्षण संचालनालय (उच्च शिक्षण)**
**महाराष्ट्र राज्य पुणे ४११०१६**

Web : www.dhepune.gov E-mail :budget.dhepune@nic.in

फोन नं. ०२०/२६१२२११९, २६१३०६२७, २६१२४६३९ फॅक्स नं. ०२०/२६१११११५३

क्र अर्थस-२६-२७/वेतन/अनु वित/ **E-१५६६७७३**/ लेखा-३ दि. सप्टेंबर २०२६

प्रति,

सर्व विभागीय सहसंचालक
( उच्च शिक्षण )

**विषय - अशासकीय अनुदानित महाविद्यालयांतील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांचे नियमित वेतन दरमहा दि.०१ तारखेस होणेबाबत.**

उपरोक्त विषयी सर्व विभागीय सहसंचालक (उच्च शिक्षण) यांना कळविण्यात येते की, अशासकीय अनुदानित कला, वाणिज्य, विज्ञान, विधी व समाजकार्य महाविद्यालये आणि अकृषि विद्यापीठांतील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांचे नियमित वेतन, तासिका तत्वावरील अध्यापकांचे मानधन, अर्जित रजा रोखीकरण व वैद्यकीय प्रतिपुर्ती अदायगीसाठी आवश्यक असलेली अनुदान मागणी **दरमहा दि.२० तारखेपर्यंत** संचालनालयास कार्यालय प्रमुखांच्या स्वाक्षरीने सादर करण्यात यावी. जेणेकरुन विहित वेळेत बी.डी.एस. प्रणालीवर अनुदान उपलब्ध करुन देणे सुलभ होईल.

अर्जित रजा रोखीकरण व वैद्यकीय प्रतिपुर्ती बाबत अनुदान मागणी मोघम स्वरुपात न करता दरमहा मंजुरी आदेशासह सादर करण्यात यावी. तसेच अशासकीय अनुदानित महाविद्यालयांतील तासिका तत्वावरील अध्यापकांचे मानधन अदायगीनंतर अदायगीचा तपशील एकत्रित गोषवाऱ्यासह महाविद्यालयनिहाय संचालनालयास दरमहा सादर करण्यात यावा.

अशासकीय अनुदानित कला, वाणिज्य, विज्ञान, विधी व समाजकार्य महाविद्यालये आणि अकृषि विद्यापीठांतील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांचे नियमित वेतन **दरमहा दि.०१ तारखेस** होईल याची दक्षता घेण्यात यावी.

Digitally signed by
SHAILENDRA KAMLAKAR DEOLANKAR
Date: 17-09-2026 18:01:03

**( डॉ. शैलेन्द्र देवळाणकर )**
प्र. शिक्षण संचालक (उच्च शिक्षण )
महाराष्ट्र राज्य पुणे.